महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website : www.doa.maharashtra.gov.in Email:dirdoa.mum-mah@gov.in/ directorateofart@gmail.com/higherartexam@gmail.com

क्रमांक- डिओओ/२०२३/चार/1012 दिनांक :- ३०.०३.२०२३

प्रति,
प्राचार्य,
शासनमान्य अशासकीय कला संस्था.

विषय: शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ आयोजनाबाबत.

कला संचालनालयामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ करिता ऑनलाईन नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे आयोजित करुन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत विहित नमुन्यातील दैनंदिन अहवाल संचालनालयाच्या higherartexam@gmail.com या ई-मेलवर सादर करावा.

अनुदान व शैक्षणिक शुल्कवाढीसाठी कला महाविद्यालय महाराष्ट्र संघ, पुणे यांनी शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ वर बहिष्काराबाबत संचालनालयास पत्राद्वारे कळविले आहे. अनुदान व शैक्षणिक शुल्कवाढीबाबत शासनास प्रस्तावित केले असून परीक्षेवर बहिष्कार घालू नये, असे कला संचालनालयाच्या दिनांक २४.०३.२०२३, २९.०३.२०२३ व ३०.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कला महाविद्यालय महाराष्ट्र संघाचे अध्यक्ष / सचिव यांना कळविले आहे.

परीक्षेवरील बहिष्कारामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याबाबतची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील, याची नोंद घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव वेळापत्रकानुसार परीक्षा आयोजन करुन विद्यार्थ्यांचा उपस्थितीबाबतचा अहवाल वेळावेळी वरीलप्रमाणे संचालनालयास सादर करावा.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचेशी आज दिनांक ३०.०३.२०२३ रोजी झालेल्या चर्चेनुसार कळविण्यात येते की, ज्या कला संस्थेत शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ चे आयोजन केले जाणार नाही त्या कला संस्थेत पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) कोणत्याही अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही. परीक्षेवरील बहिष्कारामुळे ज्या कला संस्थेत परीक्षेचे आयोजन केले जाणार नाही अशा कला संस्थेतील विद्यार्थ्यांना जवळच्या परीक्षा केंद्रावर परीक्षेस प्रविष्ठ होता येईल. अशा विद्यार्थ्यांना जवळच्या कला संस्थेच्या प्राचार्य / अधिष्ठाता यांनी त्यांच्या कला संस्थेत परीक्षेस बसण्याची व्यवस्था करावी व त्याबाबतचा अहवाल स्वतंत्रपणे संचालनालयास सादर करावा.

(राजीव मिश्रा)
प्र. कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) अधिष्ठाता, सर ज.जी.कला महावद्यालय, मुंबई
४) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
५) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
६) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर/औरंगाबाद